आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र -संध्याकाळी ७.०० वाजता
१० नोव्हेंबर २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाचं संकल्पपत्र अमित शाह यांच्या, तर महाविकास आघाडीचा महाराष्ट्रनामा काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या उपस्थितीत जाहीर
- राज्यात प्रचार शिगेला, जाहीर सभा, रोड शो इत्यादींच्या माध्यमातून विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांची मतदारांना साद
- मतदान जनजागृतीसाठी विविध स्तरांवर कार्यक्रम

  **आणि**
- भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात आज टी-ट्वेंटी क्रिकेट मालिकेतला दुसरा सामना

**<><><><><>**

भारतीय जनता पार्टीचा निवडणूक जाहीरनामा शेतकऱ्यांचा सन्मान, आणि गरीबांची सेवा करणारा, युवकांना रोजगाराच्या नव्या संधी देणारा आणि महिलांचं सक्षमीकरण करणारा असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत भाजपाचा निवडणूक जाहीरनामा प्रसिद्ध केल्यानंतर बोलत होते.

लाडकी बहीण योजनेअंतर्गत दिली जाणारी रक्कम दीड हजार रुपयांवरून एकवीसशे रुपये करणार, महिला सुरक्षेसाठी २५ हजार महिलांचा पोलिस दलात समावेश केला जाणार, शेतकऱ्यांना कर्जमाफी, २५ लाख रोजगारांची निर्मिती, अशी अनेक आश्वासनं या जाहीरनाम्यात दिली आहेत.

महाविकास आघाडीची अनेक आश्वासनं ही केवळ लोकानुनयासाठी असून ती प्रत्यक्षात उतरणारी नसल्याची टीकाही शाह यांनी केली. खोटं फार काळ टिकत नसल्यामुळेच २०२२ साली महाविकास आघाडीचं सरकार कोसळल्याचा आरोप त्यांनी केला.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, केंद्रीय मंत्री पियुष गोयल, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीचा महाराष्ट्रनामा काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी आज मुंबईत प्रकाशित केला. मुंबईत जाहीर केलेल्या पंचसूत्री कार्यक्रमावर आधारित हा सविस्तर जाहीरनामा प्रकाशित करत असल्याचं खर्गे यांनी सांगितलं. या महाराष्ट्रनाम्यात शेती आणि ग्रामीण विकास, उद्योग आणि रोजगार, पर्यावरणावर आधारित शहर विकास या मुद्द्यांवर आश्वासनं देण्यात आली आहेत. पंचसूत्री कार्यक्रमात प्रत्येक कुटुंबाला वर्षाकाठी ३ लाख रुपयांची मदत, महालक्ष्मी योजनेअंतर्गत पात्र महिलांना प्रतिमहिना ३ हजार रुपये, महिलांना मोफत बस सेवा, तीन लाखापर्यंत कृषीकर्ज माफी, बेरोजगारांना नोकरी शोधण्यासाठी दरमहा ४ हजार रुपये भत्ता, २५ लाखांचा आरोग्य विमा अशी आश्वासनं आहेत.

महाराष्ट्रासह देश आणि जगासाठी मुंबई हे एक अर्थ, रोजगार, निर्मिती, गुंतवणूक अशा सर्व घटकांच्या दृष्टीने महत्त्वाचं शहर आहे. मुंबईसह महाराष्ट्र हा सामाजिकदृष्ट्याही प्रगत आहे. त्यामुळे महाराष्ट्रातली निवडणूक ही देशासाठी महत्त्वाची निवडणूक आहे. महाराष्ट्रात महाविकास आघाडीचं सरकार आलं तर इथे एक चांगलं प्रशासन येऊ शकेल. हा जाहीरनामा महाराष्ट्राचा अभ्यास करूनच प्रकाशित करत आहोत, असं खर्गे म्हणाले.

यावेळी खासदार सुप्रिया सुळे, खासदार संजय राऊत हेही उपस्थित होते.

**<><><><><>**

राज्यात विधानसभा निवडणुकीचा प्रचार शिगेला पोचला आहे. आज विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनी जाहीर सभा, रोड शो इत्यादींच्या माध्यमातून मतदारांना

साद घातली. भाजपाचे ज्येष्ठ नेते, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीही आज राज्यात प्रचारदौरा केला.

तत्त्वांसोबत तडजोड करत कसंही करून सत्तेत येणं हा महाविकास आघाडीचा एकमेव उद्देश आहे, तर शिवाजी महाराजांच्या तत्त्वांना अनुसरून महाराष्ट्राला देशातलं पहिल्याक्रमांकाचं राज्य बनवणं हा महायुतीचा उद्देश आहे, असं अमित शाह रावेर इथल्या प्रचारसभेत म्हणाले. महायुती ही राज्याला समृद्ध करणारी युती आहे. उलेमांनी महाविकास आघाडीला समर्थन देण्यासाठी मुस्लिमांना १० टक्के आरक्षणाची मागणी केली आहे. अशाप्रकारचं आरक्षण द्यायचं झालं तर ५० टक्के आरक्षणातलं दलित, आदिवासी आणि ओबीसी यांचं आरक्षण काढून द्यावं लागेल. महाविकास आघाडीचं सरकार आलं, तर लाडकी बहीण योजना बंद केली जाईल, अशी भीती त्यांनी व्यक्त केली. देशाच्या सुरक्षेसाठी आणि राज्याच्या प्रगतीसाठी महायुतीला मतदान करायचं आवाहन त्यांनी उपस्थितांना केलं.

**<><><><><>**

काँग्रेसनं संविधानाचा सोयीनुसार वापर केला, अवहेलना केली, आणि आता भाजपा संविधान बदलणार असल्याचा विषारी प्रचार चालवला आहे, अशी टीका भाजपाचे ज्येष्ठ नेते नितीन गडकरी यांनी केली आहे. ते आज यवतमाळमधे राळेगाव इथं प्रचारसभेत बोलत होते.

**होल्ड--बाईट--गडकरी**

जातीवादी आणि सांप्रदायिक प्रचारापासून दूर रहावं असं आवाहनही त्यांनी मतदारांना केलं.

**<><><><><>**

भाजपा संविधान बदलणार असल्याचा खोटा आरोप काँग्रेस करत असून, आता जनता त्याला बळी पडणार नाही, असं भाजपा नेते आणि केंद्रीय मंत्री किरेन रिजीजू यांनीही म्हटलं आहे. ते नाशिक इथं वार्ताहर परिषदेत बोलत होते.

यावेळी माजी केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री भारती पवार, आणि इतर नेते उपस्थित होते.

**<><><><><>**

**लोकसभा** निवडणुकीत भाजपला मतदारांनी स्पष्ट कौल न दिल्यानं मतदारांना आकर्षित करण्यासाठी त्यांनी लाडकी बहीण सारखी योजना आणली, असं मत ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी व्यक्त केलं. ते आज एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत बोलत होते. भाजपाच्या नेतृत्वाखालचं सरकार संविधानाला धक्का पोहोचवेल अशी भिती लोकसभा निवडणुकीवेळी मतदारांमध्ये होती, ती अजूनही संपलेली नाही, त्याचा परिणाम विधानसभा निवडणुकीतही दिसून येईल, असंही पवार म्हणाले.

**धाराशिव** जिल्ह्यातल्या भूम परांडा विधानसभा मतदारसंघात शरद पवार यांनी प्रचारसभा घेतली. आपल्या पक्षातल्या काही लोकांनी भाजपाला साथ दिली. केंद्रीय संस्थाच्या भीतीनं आपण भाजपासोबत गेल्याचं छगन भुजबळ यांनी कबूल केल्याचं पवार म्हणाले. ही निवडणूक महाराष्ट्राच्या स्वाभिमानाची आहे, त्यासाठी तुमची साथ हवी आहे, असं आवाहन पवार यांनी मतदारांना केलं.

**<><><><><>**

महाविकास आघाडीचा महाराष्ट्रनामा हा वचननामा नसून ‘थापा’नामा असल्याची टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. ठाणे इथं आज त्यांनी प्रचारासाठी रॅली काढली, तेव्हा ते बातमीदारांशी बोलत होते.

महायुतीनं ‘लाडकी बहीण’ योजना सुरु केली, तेव्हा पैसे कुठून आणणार असं म्हणत आमच्याविरोधात न्यायालयात धाव घेणाऱ्यांनी आता आमच्या योजना चोरून आता ते खोटी आश्वासनं देत आहेत, असा आरोप त्यांनी केला.

**<><><><><>**

**राज्यातला** शेतकरी शेतमालाला हमीभाव मागत आहे, मात्र भाजपाचे नेते इतर मुद्यांवर बोलून दिशाभूल करत आहेत अशी टीका माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज सांगोला इथल्या प्रचारसभेत केली. काश्मीरमधलं ३७० कलम हटवलं असं नरेंद्र मोदी सांगतात मात्र काश्मीरमधले दहशतवादी हल्ले अजूनही थांबले नाहीत, भाजपाच्या नेत्यांना देशाच्या सुरक्षेपेक्षा राज्यातल्या निवडणुका जास्त महत्वाच्या वाटतात असं ठाकरे म्हणाले. महाविकास आघाडीची सत्ता आल्यावर पुढची पाच वर्षं जीवनावश्यक वस्तूंचे भाव स्थिर ठेवू असं आश्वासन त्यांनी दिलं.

**हिंगोली** जिल्ह्यातल्या कळमनुरी मतदारसंघातही उद्धव ठाकरे यांनी प्रचारसभेला संबोधित केलं. भाजपा सरकारनं महाराष्ट्राची फसवणूक केली असल्याची टीका त्यांनी यावेळी केली.

**<><><><><>**

पुणे शहरातही आज विविध पक्षाच्या उमेदवारांनी जोरदार प्रचार केला. मला खुर्चीचा किंवा सत्तेचा सोस नाही, तर महाराष्ट्राला सुजलाम सुफलाम करायचंय, म्हणून माझ्या हाती एकदा सत्ता द्या, असं आवाहन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज पुण्यात आयोजित प्रचार सभेत केलं.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीत मतदारांनी मतदानाचं कर्तव्य करावं याकरता मतदान जनजागृतीचे कार्यक्रम महाराष्ट्रात सर्वत्र होत आहेत. निवडणूक आयोग आणि केंद्रीय संचार ब्यूरो तर्फे जनजागृती करणारी वाहनं राज्यातल्या १५

जिल्ह्यांमधे पाठवली आहेत. ठिकठिकाणी प्रशासकीय यंत्रणा आणि स्वयंसेवी संस्था संघटनांमार्फत मॅरेथॉन, प्रदर्शन, कार्यशाळा असे कार्यक्रम होत आहेत.

<><><><>

मतदार जनजागृतीसाठी आज रत्नागिरी शहरात मॅरॅथॉन आयोजित केली होती. पोलीस मैदानातून सुरू झालेल्या या मॅरॅथॉनची सांगता भाट्ये समुद्रकिनाऱ्यावर झाली. विधानसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी सर्व नागरिकांनी ब्रँड अँबेसेडर म्हणून काम करावं, असं आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी केलं.

<><><><>

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

<><><><>

भारत - दक्षिण आफ्रिका क्रिकेट टी-ट्वेंटी मालिकेतला दुसरा सामना आज संध्याकाळी गकेबरहा इथल्या सेंट जॉर्ज पार्क क्रिकेट मैदानावर होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री साडेआठ वाजता हा सामना सुरू होईल. तिसरा सामना बुधवारी सेंच्युरियनमध्ये, तर चौथा सामना शुक्रवारी जोहान्सबर्ग इथं होणार आहे. मालिकेतला पहिला सामना भारतानं जिंकला आहे.

<><><><>

येत्या १२ नोव्हेंबरला होणाऱ्या कार्तिकी यात्रेच्या सोहळ्यानिमित्तानं पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई केली आहे. मंदिर समितीचं प्रवेशद्वार, मंदिराचं शिखर, सात मजली दर्शन मंडप या ठिकाणी रंगीबेरंगी आकर्षक

विद्युत रोषणाई केली आहे. विद्युत रोषणाईमुळे मंदिर परिसर दिव्यांच्या प्रकाशानं उजळून निघाला आहे.

<><><><><>

छत्तीसगड इथल्या बिजापूर जिल्ह्याची रहिवासी असलेल्या लक्ष्मी बंडे मज्जी या नक्षलवादी महिलेनं काल गडचिरोली पोलीस आणि केंद्रीय राखीव दलापुढे आत्मसमर्पण केलं. लक्ष्मी मज्जी ही २०१७ मध्ये भामरागड दलम आणि इंद्रावती एरिया कमिटीमध्ये चेतना नाट्य मंचची सदस्य म्हणून दाखल झाली. राज्य शासनानं तिच्यावर २ लाख रुपयांचं बक्षीस जाहीर केलं होतं.

<><><><><>

मुंबईच्या विक्रोळी उपनगर परिसरात निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिस आणि निवडणूक आयोगाच्या भरारी पथकानं साडेसहा टन वजनाच्या चांदीच्या विटा असलेली व्हॅन जप्त केली आहे. मुलुंडमधल्या एका गोदामात त्या नेण्यात येत होत्या. निवडणूक आयोग, आयकर विभाग आणि पोलिस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

<><><><><>

नागपूरच्या धरमपेठ परिसरात ३७ लाख ७१ हजार रुपये किमतीचा महागड्या विदेशी मद्याचा साठा आणि अन्य मुद्देमाल जप्त केला आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाने सिताबर्डी पोलिस ठाण्याच्या हद्दीत ही कारवाई केली. महाराष्ट्रात विक्रीसाठी प्रतिबंधित असलेला हा मद्यसाठा हरियाणामधून आणल्याचे उघडकीस आले आहे. या प्रकरणी पोलिसांनी एकाला अटक करुन त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

<><><><><>

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात पुढचे ४८ तास हवामान कोरडं राहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. १४ नोव्हेंबर रोजी मध्य

महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यताही हवामान विभागानं कळवली आहे.